-जाहिरात-                दिनांक ०७.०८.२०२६

Details on Website : https://directorate-marathi.maharashtra.gov.in

**भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य, यांचे कार्यालय, प्रशासकीय इमारत, ५ वा मजला, डॉ.आंबेडकर उद्यानाजवळ, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.**

**अर्थसंकल्पीय व प्रकल्प कामकाज सल्लागार हे पद करार पध्दतीने राज्य शासकीय कार्यालयातून गट- अ संवर्गातील (वेतनस्तर एस-२५ किंवा अधिक) सेवानिवृत्त शासकीय अधिकाऱ्यांमधून भरण्याबाबत**

**विभागाची आवश्यकता :**

**१. अभिजात भाषा दर्जा आणि वाढता कार्यभार :**

मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यामुळे केंद्र शासनाकडून मिळणारे सर्व अपेक्षित लाभ मिळवणे. भाषेचा प्रचार, प्रसार आणि संशोधनाचे काम वाढल्याने मराठी भाषा विभागातील प्रशासकीय व धोरणात्मक कामकाजाचे व्यवस्थापन करणे.

**२. राजभाषा डिजिटल पोर्टल प्रणाली :**

भाषा संचालनालयामार्फत 'राजभाषा मराठी पोर्टल' हे एकात्मिक डिजिटल व्यासपीठ (Integrated Digital Platform) विकसित करणे. मराठी भाषेच्या संवर्धनासाठी काम करणाऱ्या सर्व संस्था, घटक आणि नागरिकांना एकाच छताखाली आणून सुलभ डिजिटल सेवा उपलब्ध करून देणे.

**३. 'मराठी भाषा अधिकारी' आणि प्रशिक्षण पोर्टल :**

महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, १९६४ च्या काटेकोर अंमलबजावणीसाठी सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालयांमध्ये मराठी भाषा अधिकाऱ्यांची नियुक्ती करणे. या अधिकाऱ्यांसाठी स्वतंत्र 'मराठी भाषा अधिकारी पोर्टल' तयार करणे. मराठी भाषेशी संबंधित ऑनलाईन प्रशिक्षण व प्रमाणपत्र देण्यासाठी विशेष प्रशिक्षण पोर्टलची निर्मिती आणि अंमलबजावणी करणे.

**४. व्हिजन डॉक्युमेंट-२०४७ अनुवाद कृती आराखडा :**

'महाराष्ट्र व्हिजन डॉक्युमेंट-२०४७' अंतर्गत उत्कृष्ट मराठी पुस्तकांचा इतर भारतीय व परदेशी भाषांमध्ये अनुवाद करण्यासाठी तयार केलेल्या कृती आराखड्याची (Action Plan) अंमलबजावणी करणे.

**५. ए.आय. (AI) आणि दुर्मिळ हस्तलिखितांचे डिजिटायझेशन :**

ए.आय. कॉर्पस (AI Corpus): कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित आधुनिक मराठी शब्दकोश तयार करणे. डिजिटायझेशन: महाराष्ट्रातील दुर्मिळ मराठी हस्तलिखिते (Manuscripts) आणि प्राचीन दस्तऐवज डिजिटल स्वरूपात सुरक्षित ठेवण्यासाठी नियोजन व अंमलबजावणी करणे.

| | |
|---|---|
| | **६. 'यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र अनुवाद अकादमी' :**<br>ई-गव्हर्नन्स, तंत्रज्ञान आणि जागतिकीकरणामुळे वाढलेल्या भाषिक गरजा लक्षात घेऊन दर्जेदार व प्रमाणित अनुवादासाठी 'यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र अनुवाद अकादमी' स्थापन करणे.<br>कुशल व प्रशिक्षित अनुवादक (Translators) घडवणे आणि या संपूर्ण प्रक्रियेवर देखरेख व सनियंत्रण (Monitoring) ठेवणे.<br><br>७. **मराठी भाषा अध्ययन उत्कृष्टता केंद्र (Centre of Excellence) :**<br>केंद्र शासनाकडून 'अभिजात मराठी भाषा अध्ययन उत्कृष्टता केंद्र' मंजूर करून घेण्यासाठी सातत्याने पाठपुरावा करणे. संशोधनात्मक कामे विविध संस्था व तज्ज्ञांकडे सोपवण्यासाठी सामंजस्य करार (MoUs) करणे. केंद्राकडून येणाऱ्या निधीचे वितरण करणे आणि 'अभिजात मराठी सप्ताहा'निमित्त विविध सांस्कृतिक व शैक्षणिक कार्यक्रमांचे आयोजन करणे.<br>**८. अभिजात मराठी संशोधन प्रकल्प :**<br>प्राचीन ग्रंथ आणि हस्तलिखितांचा अभ्यास करणाऱ्या संस्था व व्यक्तींना संशोधन प्रकल्प सोपवणे. या दीर्घकालीन संशोधन प्रकल्पांसाठी केंद्र सरकारकडून जास्तीत जास्त अर्थसहाय्य व निधी उपलब्ध करून घेण्यासाठी योजना आखणे व पाठपुरावा करणे.<br>वरील सर्व प्रकल्पांच्या कामकाजांचे आर्थिक नियोजन करणे, देखरेख ठेवणे व त्याचे सनियंत्रण करणे या कामांकरीता **अर्थसंकल्पीय व प्रकल्प कामकाज सल्लागार** या पदनामाच्या एका पदावर राज्य शासनाच्या गट-अ संवर्गातील (वेतनस्तर एस-२५ किंवा अधिक) पदावरुन सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्याची मराठी भाषा विभाग, मंत्रालय, मुंबई याच्या अधिपत्याखालील भाषा संचालनालय कार्यालय येथे करार पध्दतीने नियुक्ती करावयाची आहे.<br><u>अटी व शर्ती -:</u><br>१) सदर नियुक्ती **<u>केवळ एक वर्षाच्या कालावधीकरिता</u>** सामान्य प्रशासन विभागाच्या क्र. सीबीई-१५२५/प्र.क्र.३७/ आस्थामं (का.१३), दिनांक १० जून, २०२५ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार करण्यात येणार आहे.<br>२) राज्य शासनाच्या प्रशासकीय विभागाच्या गट-अ संवर्गातील (वेतनस्तर एस-२५ किंवा अधिक) वित्त व लेखा विषयक पदावरुन सेवानिवृत्त झालेला अधिकारी असावा. तसेच, त्यांच्याकडे प्रकल्प व्यवस्थापन कौशल्ये आणि विश्लेषणात्मक विचारसरणी याचा अनुभव असावा.<br>३) उमेदवारास वित्त, लेखा व प्रकल्प अंमलबजावणी पदावरील किमान ७ वर्षांचा अनुभव असावा.<br>४) उमेदवारास BEAMS प्रणाली हाताळण्याचा अनुभव असावा.<br>५) उमेदवारास मराठी व इंग्रजी भाषेचे चांगले ज्ञान असावे. |

| | |
|---|---|
| | ६) उमेदवाराचे वय ६५ वर्षांपेक्षा अधिक नसावे.<br>७) उमेदवार मुंबई अथवा लगतच्या जिल्ह्यात राहणारा असावा.<br>८) आवश्यक अर्हता धारण करणाऱ्या इच्छुक सेवानिवृत्त अधिकाऱ्यांनी सदर पदाकरिता विहित नमुन्यात अर्ज सादर करावा.<br>९) उमेदवाराने त्यांचे अर्ज सदर पदाकरिता वेबसाईटवरील माहिती पाहून bhashasanchalak@yahoo.in या मेल आयडीवर जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून **७ दिवसांच्या आत करावेत.** या संदर्भात अधिक माहितीसाठी **९३२२५३८७७६ (श्री.सुनिल शिरसाट, अधीक्षक), ९६६५१६८६६६ (श्री. अनुराग डोईजड, वरिष्ठ लिपिक)** या दूरध्वनीवर संपर्क साधावा. विहित दिनांकानंतर प्राप्त झालेल्या अर्जावर कार्यवाही करण्यात येणार नाही. तसेच या संदर्भातील कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल घेण्यात येणार नाही.<br>१०) विभागास आवश्यक असलेली अर्हता व अनुभव नसलेल्या सेवानिवृत्त अधिकारी यांनी अर्ज सादर केल्यास अशा अर्जाचा विचार करण्यात येणार नाही. तसेच अशा अर्जासंदर्भात शासनाशी केलेल्या पत्रव्यवहाराची दखल घेण्यात येणार नाही. तसेच अशा अर्जांना उत्तर देण्यात येणार नाही.<br>११) मुलाखतीद्वारे पात्र उमेदवारांची निवड करण्यात येईल. उमेदवार निवडीबाबतचा संपूर्ण अधिकार विभागाचा राहील.<br>१२) करार पध्दतीने नियुक्त सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांस मराठी भाषा विभाग, नवीन प्रशासकीय इमारत, मंत्रालय, मुंबई येथे काम करावे लागेल.<br>१३) इतर अटी व शर्ती सामान्य प्रशासन विभागाच्या क्र. सीबीई-१५२५ / प्र.क्र.३७/ आस्थामं (का.१३), दिनांक १० जून, २०२५ च्या शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे राहतील.<br>--x-- |

**भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य, यांचे कार्यालय, प्रशासकीय इमारत, ५ वा मजला, डॉ.आंबेडकर उद्यानाजवळ, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.**

**राज्य शासनाच्या वित्त व लेखा पदावरील गट-अ** (वेतनस्तर एस-२५ किंवा अधिक) **संवर्गातील सेवानिवृत्त अधिकारी यांची करार पध्दतीने नियुक्ती करण्याबाबत**

१. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यामुळे केंद्र शासनाकडून मिळणारे सर्व अपेक्षित लाभ मिळवणे. भाषेचा प्रचार, प्रसार आणि संशोधनाचे काम वाढल्याने मराठी भाषा विभागातील प्रशासकीय व धोरणात्मक कामकाजाचे व्यवस्थापन करणे.

२. भाषा संचालनालयामार्फत 'राजभाषा मराठी पोर्टल' हे एकात्मिक डिजिटल व्यासपीठ (Integrated Digital Platform) विकसित करणे.मराठी भाषेच्या संवर्धनासाठी काम करणाऱ्या सर्व संस्था, घटक आणि नागरिकांना एकाच छताखाली आणून सुलभ डिजिटल सेवा उपलब्ध करून देणे.

३. महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, १९६४ च्या काटेकोर अंमलबजावणीसाठी सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालयांमध्ये मराठी भाषा अधिकाऱ्यांची नियुक्ती करणे. या अधिकाऱ्यांसाठी स्वतंत्र 'मराठी भाषा अधिकारी पोर्टल' तयार करणे. मराठी भाषेशी संबंधित ऑनलाईन प्रशिक्षण व प्रमाणपत्र देण्यासाठी विशेष प्रशिक्षण पोर्टलची निर्मिती आणि अंमलबजावणी करणे.

४. 'महाराष्ट्र व्हिजन डॉक्युमेंट-२०४७' अंतर्गत उत्कृष्ट मराठी पुस्तकांचा इतर भारतीय व परदेशी भाषांमध्ये अनुवाद करण्यासाठी तयार केलेल्या कृती आराखड्याची (Action Plan) अंमलबजावणी करणे.

५. ए.आय. कॉर्पस (AI Corpus): कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित आधुनिक मराठी शब्दकोश तयार करणे. डिजिटायझेशन: महाराष्ट्रातील दुर्मिळ मराठी हस्तलिखिते (Manuscripts) आणि प्राचीन दस्तऐवज डिजिटल स्वरूपात सुरक्षित ठेवण्यासाठी नियोजन व अंमलबजावणी करणे.

६. ई-गव्हर्नन्स, तंत्रज्ञान आणि जागतिकीकरणामुळे वाढलेल्या भाषिक गरजा लक्षात घेऊन दर्जेदार व प्रमाणित अनुवादासाठी 'यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र अनुवाद अकादमी' स्थापन करणे.कुशल व प्रशिक्षित अनुवादक (Translators) घडवणे आणि या संपूर्ण प्रक्रियेवर देखरेख व सनियंत्रण (Monitoring) ठेवणे.

७. केंद्र शासनाकडून 'अभिजात मराठी भाषा अध्ययन उत्कृष्टता केंद्र' (Centre of Excellence) मंजूर करून घेण्यासाठी सातत्याने पाठपुरावा करणे. संशोधनात्मक कामे विविध संस्था व तज्ज्ञांकडे सोपवण्यासाठी सामंजस्य करार (MoUs) करणे. केंद्राकडून येणाऱ्या निधीचे वितरण करणे आणि 'अभिजात मराठी सप्ताहा'निमित्त विविध सांस्कृतिक व शैक्षणिक कार्यक्रमांचे आयोजन करणे.

८. प्राचीन ग्रंथ आणि हस्तलिखितांचा अभ्यास करणाऱ्या संस्था व व्यक्तींना संशोधन प्रकल्प सोपवणे. या दीर्घकालीन संशोधन प्रकल्पांसाठी केंद्र सरकारकडून जास्तीत जास्त अर्थसहाय्य व निधी उपलब्ध करून घेण्यासाठी योजना आखणे व पाठपुरावा करणे.

वरील सर्व प्रकल्पांच्या कामकाजांचे आर्थिक नियोजन करणे, देखरेख ठेवणे व त्याचे सनियंत्रण करणे करण्याकरीता अर्थसंकल्पीय व प्रकल्प कामकाज सल्लागार या पदनामाच्या एका पदावर राज्य शासनाच्या गट-अ संवर्गातील पदावरुन सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्याची मराठी भाषा विभाग, मंत्रालय, मुंबई च्या अधिपत्याखालील भाषा संचालनालय कार्यालय येथे करार पध्दतीने नियुक्ती करावयाची आहे. सदर नियुक्ती सामान्य प्रशासन विभागाच्या क्र. सीबीई-१५२५ /प्र.क्र.३७/ आस्थामं (का.१३), दिनांक १० जून, २०२५ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार करण्यात येणार आहे.

अधिक माहिती विभागाचे संकेतस्थळ https://directorate-marathi.maharashtra.gov.in वर उपलब्ध आहे. इच्छुक व्यक्तींनी वेबसाईटवरील माहिती पाहून अर्ज करावेत.

अर्ज जाहिरातीच्या दिनांकापासून ७ दिवसांत सादर करावा.

भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य.

<u>अर्जाचा नमुना</u>

<u>राज्य शासनातील गट-अ संवर्गीय सेवेमधून सेवानिवृत्त अधिकारी यांची करार पद्धतीने नियुक्ती करण्याकरिता अर्ज</u>

| उमेदवाराने अलीकडील काळातील स्वत:चे छायाचित्र येथे चिकटवावे |
|---|

१) अर्जदाराचे संपूर्ण नांव :-...........................................................................

२) अर्जदाराचा पत्ता :-............................................................................

३) सेवानिवृत्तीच्या वेळचे पदनाम :-............................................................................

४) भ्रमणध्वनी क्रमांक :-............................................................................

५) जन्म दिनांक व वय :-............................................................................

६) विभागास आवश्यक अर्हता अर्जदाराकडे आहे काय? :- होय/नाही

७) अनुभव :-

.............................................................................................................................................
.............................................................................................................................................
..................................................................................................................................

उपरोक्त गट-अ (वेतनस्तर एस-२५ किंवा अधिक) सेवेमधून सेवानिवृत्त अधिकारी यांची करार पद्धतीने नियुक्तीबाबतची जाहिरात/सूचना मी काळजीपूर्वक वाचली असून सदर जाहिरातीतील/ सूचनेतील सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

**ठिकाण -:**

**दिनांक -:**

**अर्जदाराची स्वाक्षरी**